।। बहुजन हिताय । बहुजन सुखाय ।।

४० वर्षापासून नियमितपणे प्रकाशित होणारे जनसामान्यांच्या प्रश्नांचा ध्यास असणारे एकमेव निर्भिड...

४१

साप्ताहिक **माणदेश वार्ता**

संस्थापक संपादक :
स्व.मारुती शिवाजी सोनवणे (एम.ए.)

स्थापना
६ नोव्हेंबर १९८३

RNI NO.
MAH/MAR/2004/16467

POSTAL REGD.
L2/RNP/PPR/04/2024-2026

FACEBOOK
MANDESH VARTA

सांगोला * जुने वर्ष ४१ वे नवीन वर्ष २१ वे * रविवार दि.४ ऑगस्ट २०२४ * पाने ४ * मूल्य १ ₹ * अंक २९ वा

# पेट्रोल पंपावरील कर्मचाऱ्यांच्या सतर्कतेमुळे दुचाकी चोरट्यांना पोलिसांकडे स्वाधीन

## गाडीच्या नंबरवरून आला संशय: पाठलाग करून पकडले

सांगोला : कडलास (ता. सांगोला) येथील पेट्रोल पंपावरील कर्मचाऱ्यांच्या सतर्कतेमुळे दुचाकी चोरी करणाऱ्या दोन अल्पवयीन मुलांना दोन चोरीच्या दुचाकींसह पकडून रात्र गस्तीवरील पोलिसांच्या स्वाधीन केले. पेट्रोल पंपावरील कामगार दत्तात्रय संजय पवार (रा. कडलास) या युवकाने मोठ्या शिताफीने दुचाकी चोरट्यांना पकडून कामगिरी केल्यामुळे त्याचे सर्वत्र कौतुक होत आहे.

दोन अल्पवयीन मुलांनी सांगोला स्टेशन रोड व कडलास (पवारवाडी) येथून चोरलेल्या दोन दुचाकी कडलास येथील विजय गव्हाणे यांच्या पेट्रोल पंपावर बुधवारी रात्री १०:१५ वाजता घेऊन आले होते. त्याठिकाणी दोन मुले दुचाकीतील पेट्रेल काढताना कर्मचारी पवार याने पाहून त्यांच्याकडे नाव, गाव अधिक चौकशी केली असता त्यांच्या हालचाली संशयास्पद वाटल्या व त्यांच्याकडील एम. एच. ४५ एक्स-४९८७ या दुचाकीचा नंबर ओळखून त्याने अरुण गायकवाड यांना फोन करून तुम्ही दुचाकी कोणाला दिली आहे का? अशी विचारणा केली असता त्यांनी माझी दुचाकी सांगोल्यातून चोरीला गेल्याचे सांगितले. तोपर्यंत त्या अल्पवयीन

मुलांनी एक दुचाकी पंपावर ठेवून सांगोला रस्त्याने धम ठोकली. दत्ता पवार यांनी इतरांच्या मदतीने त्यांचा पाठलाग करून सांगोला रोडवरील एका पिकअप शेडमध्ये दोघांना पकडले. मात्र, त्यावेळी त्यांच्यासमवेत आणखी असणाऱ्या दोघांनी तेथून धूम ठोकली. त्यानंतर विजय गव्हाणे यांनी पंपावर ग्रामस्थांकडून मुलांना मारहाण न होऊ देता त्यांच्याकडे विचारणा केली.



कडलास येथून पकडलेल्या दोन अल्पवयीन मुलांकडे चौकशी करून घेरडी येथून एकास ताब्यात घेतले आहे. त्याच्याकडून आतापर्यंत चोरीच्या ५ दुचाकी हस्तगत केल्या असून अजून बऱ्याच चोरीच्या दुचाकी मिळणार आहेत.

-भीमराव खणदाळे,
पोलिस निरीक्षक, सांगोला

**दुचाकीमागे ३ हजार रुपये..**

मुलांनी बुधवारी दिवसभरात सांगोला शहर, कडलास व जत येथून तब्बल ६ ते ७ दुचाकी चोरल्याचे सांगितले व चोरीच्या दुचाकी पुढे घेरडी येथील हातेकर नामक व्यक्तीला दिल्यानंतर त्यांच्याकडून प्रत्येक दुचाकीमागे मुलांना ३ हजार रुपये मिळत असल्याचे सांगितले. सध्या पोलिसांच्या ताब्यात त्या दोन अल्पवयीन मुलांसह चोरीच्या दुचाकी घेणारा घेरडीतील हातेकर ताब्यात असून त्याच्याकडे चौकशी सुरू आहे.

## आनंदाभाऊ माने यांच्या वाढदिवसानिमित्त शहरात विविध ठिकाणी केले वृक्षारोपण

## सांगोला नगरपालिकेस आनंदाभाऊ माने यांच्याकडून ३१ झाडे भेट



सांगोला : सांगोला नगरपालिकेचे माजी नगरसेवक तथा गटनेते व राजमाता प्रतिष्ठानचे संस्थापक अध्यक्ष आनंदा भाऊ माने यांच्या वाढदिवसानिमित्त ३ ऑगस्ट २०२४ रोजी सांगोला शहरातील जुने आरक्षण क्रमांक ४६ बगीचासह इतर ठिकाणी मान्यवरांच्या हस्ते वृक्षारोपण करण्यात आले. निसर्गाचा समतोल रहावा व निसर्गाचे संवर्धन व्हावे यासाठी आनंदाभाऊ माने हे गेल्या अनेक वर्षापासून आपल्या वाढदिवसानिमित्त शहरांमध्ये वृक्षा रोपण करतात. त्यांनी वाढदिवसानिमित्त लावलेली झाडे आज अनेकांना सावली देत आहेत. आनंदाभाऊ माने यांच्या निसर्गाप्रती असलेल्या प्रेमाचे व उपक्रमाचे सांगोला शहर व तालुक्यात विशेष कौतुक केले जात आहे.

यासाठी त्यांना मित्रपरिवाराचे विशेष सहकार्य लाभते .सोलापूर वन विभागात लेखापाल पदावर कार्यरत असणारे नरेंद्र दोडके यांनी आनंदा भाऊ माने यांच्या वाढदिवसानिमित्त राजमाता प्रतिष्ठान कार्यालयास ५० झाडे भेट देऊन निसर्गाप्रती असलेले आपले प्रेम व कर्तव्य व्यक्त केले आहे. वृक्षारोपण कार्यक्रमास तायाप्पा माने, सोलापूर वन विभाग लेखापाल नरेंद्र दोडके, ॲड.महादेव पारसे, दिलीप जानकर, दत्ताभाऊ जानकर, ज्ञानेश्वर गाडेकर, कुंडलीक गायकवाड, सोहेल मुजावर, समाधान नरुटे, ऋषि जानकर, अशपाक मुलाणी, अरुण कोळेकर, काशिलिंग गाडेकर, विनोद ढोबळे, शाहिद मुलाणी, सोमा चव्हाण, विशाल जानकर, जय बनसोडे, तोहीद शेख, अब्बास पटेल, राजेंद्र उकिरडे, संतोष लवटे, तोफिक मुजावर, बिटू माने, विशाल वाघ, नगरपालिकेचे आरिफ मुलाणी, नवज्योत ठेकळे, प्रशांत पारसे, भागवत राऊत यांच्यासह आदी मान्यवर उपस्थित होते. आनंदा भाऊ माने मित्रपरिवार तसेच, काशिलिंग गाडेकर मित्रपरिवार यांनी वृक्षारोपण करण्यासाठी परिश्रम घेतले.

माजी नगरसेवक आनंदाभाऊ माने यांच्या वाढदिवसानिमित्त माझी वसुंधरा अंतर्गत सांगोला नगरपालिकेस माझे लाडके झाड या शासनाच्या उपक्रमा निमित्त नगरपालिकेस ३१ झाडे भेट देण्यात आली. गेल्या अनेक वर्षांपासून आनंदाभाऊ माने हे वाढदिवसानिमित्त सांगोला नगरपालिकेत झाडे भेट देऊन नगरपालिकेच्या वृक्षारोपण उपक्रमामध्ये सहभागी होतात.

## रोटरी क्लब व इनरव्हिल क्लब सांगोला यांच्या संयुक्त विद्यमाने

## १५ ऑगस्ट रोजी देशभक्तीपर गितांवर समुह नृत्य स्पर्धांचे आयोजन

सांगोला : सांगोला शहर व तालुक्यातील प्राथमिक व माध्यमिक विद्यालयातील विद्यार्थ्यांसाठी सालाबादप्रमाणे रोटरी क्लब व इनरव्हिल क्लब सांगोला यांचे संयुक्त विद्यमाने गुरुवार दि. १५ ऑगस्ट २०२४ रोजी दुपारी १ वाजता देशभक्तीपर गीतांवर समूह नृत्य स्पर्धेचे आयोजन करण्यात आले असल्याची माहिती रोटरी क्लबचे अध्यक्ष रो.इंजि.विकास देशपांडे व इनरव्हील क्लबच्या अध्यक्षा सौ.स्वाती अंकलगी यांनी दिली.

सदर स्पर्धेमध्ये इयत्ता पहिली ते चौथी गटातील प्रथम क्रमांक विजेत्या संघास ३००० रु.व ट्रॉफी, द्वितीय क्रमांक विजेत्या संघास २०००/- रु. व ट्रॉफी तृतीय क्रमांक विजेत्या संघास १०००/- रु. व ट्रॉफी देण्यात येणार आहे.तसेच इयत्ता पाचवी ते सातवी गटातील प्रथम क्रमांक विजेत्या संघास ४००० रु.व टॉफी द्वितीय क्रमांक विजेत्या संघास ३०००/- रु. व ट्रॉफी तृतीय क्रमांक विजेत्या संघास २०००/ - रु. व ट्रॉफी देण्यात येणार आहे तर इयत्ता आठवी ते दहावी गटातील प्रथम क्रमांक विजेत्या संघास ५००० रु. व ट्रॉफी, द्वितीय क्रमांक विजेत्या संघास ४०००/- रु. व ट्रॉफी तृतीय क्रमांक विजेत्या संघास ३०००/- रु. व ट्रॉफी देण्यात येणार आहे. स्पर्धेसाठी १) प्रत्येक गटात प्रथम नाव नोंदविणाऱ्या १५ संघास प्रवेश दिला जाईल. २) प्रत्येक गटात, प्रत्येक शाळेला एकच संघ पाठविता येईल. ३) समूह नृत्यामध्ये विद्यार्थी संख्या ७ ते १२ असावी. ४) समूह नृत्य हे देशभक्ति गितावर आधारीत असावे. रिमिक्स असू नये. मूळ चाली असावे. ५) अनेक गीताचे मुखडे एकत्र करुन तयार केलेले गीत असू नये. ६) गीत ५ ते ७ मिनीटाचे असावे. ७) सी.डी/पेनडाईव्ह मध्ये एकच गीत असावे. ८) कॅसेट नृत्य असावे, प्रत्यक्ष वाद्यवृंद आणू नये. ९) रिमिक्स व अश्लिल गीत स्वीकारली जाणार नाही. १०) परिक्षकांचा निर्णय अंतिम राहील. ११) स्पर्धेसंबंधी कोणाची कोणत्याही प्रकारची हरकत अथवा तक्रार स्वीकारली जाणार नाही. १२) स्पर्धा सुरु असताना अथवा संपल्यानंतर कोणत्याही संघाने अथवा शाळेने गाँधळ अथवा हुल्लडबाजी केलेचे निर्दर्शनास आल्यास संबंधित संघास अथवा शाळेस पुढील तीन वर्षासाठी सहभागी करून घेतले जाणार नाही. १३) नोंदणी दि. १३/०८/ २०२४ सायं. ५ वाजेपर्यंत राहील.असे नियम व अटी ठेवण्यात आल्या आहेत.

स्पर्धेच्या अधिक माहितीसाठी व नावनोंदणीसाठी रो. इंजि. हमीद शेख मो ९८२२२११५२५, रो. इंजि. अशोक गोडसे मो.-९४२३३२७३४६, रो. इंजि.विकास देशपांडे मो. ९४२२६४४६४४, रो. इंजि. विलास बिले मो. ९४२१०६५६१७,सौ. स्वाती अंकलगी मो ९७६३०६३०६१, सौ. पल्लवी थोरात मो ८६०००८६२३६ यांच्याशी संपर्क साधावा. तरी जास्त जास्त शाळांनी स्पर्धेत सहभाग नोंदवावा असे आवाहन रोटरी क्लबचे सचिव रो. इंजि. विलास बिले व इनरव्हील क्लबच्या सचिव सौ. पल्लवी थोरात यांचेकडून करण्यात आले आहे.

# संपादकीय......

जुने वर्ष-४१ वे
अंक-३६ वा

## सामाजिक सुरक्षा बजेट; विसरलेली तळटीप

भारताच्या २०२३-२४ च्या आर्थिक सर्वेक्षणाने, भारताच्या वृद्ध लोकसंख्येच्या काळजीच्या गरजा पूर्ण करण्यासाठी धोरणात्मक हस्तक्षेपांच्या तात्काळ गरजेवर भर देत, जवळ येत असलेल्या लोकसंख्याशास्त्रीय संकटाचा इशारा दिला आहे. इंडिया एजिंग रिपोर्ट २०२३ सारख्याच समस्यांबद्दल सावधगिरी बाळगतो. अहवालात असे सुचवण्यात आले आहे की ज्येष्ठ नागरिकांना दीर्घकालीन आजार, शारीरिक मर्यादा, विशेषत: ग्रामीण भागात सामना करावा लागतो. अंदाज असे सूचित करतात की २०५० पर्यंत, लोकसंख्येपैकी २०.८% वृद्ध असतील, दीर्घकालीन कारवाईची आवश्यकता दर्शविते. आर्थिकदृष्ट्या दुर्बल असलेल्या करोडो लोकांच्या कल्याणकारी गरजा पूर्ण करणे हे सरकारसमोरील सर्वात मोठे आव्हान आहे.

१८ व्या लोकसभेच्या उद्घाटनाच्या अर्थसंकल्पात, अर्थमंत्र्यांनी 'कल्याण' या शब्दाचा एकट्याने केलेला उल्लेख, केंद्रीय अर्थसंकल्प २०२४-२५ या समस्यांचे निराकरण करण्यासाठी कोणतीही ठोस धोरणात्मक वचनबद्धता किंवा वाटप नसलेला असेल हे स्पष्ट संकेत म्हणून उभे राहिले.

२०२४-२५ च्या अर्थसंकल्पात संघटित क्षेत्र आणि पगारदार वर्गाच्या मागण्यांना प्राधान्य देण्यात आले असून लाखो अनौपचारिक आणि असंघटित क्षेत्रातील कामगारांच्या आर्थिक आणि सामाजिक सुरक्षेकडे पूर्णपणे दुर्लक्ष केले आहे. केंद्र सरकार सामाजिक क्षेत्रावर खर्च करण्यापेक्षा मोठ्या प्रमाणात खर्च करून राजकीय मित्रपक्षांना खूश करण्यास प्राधान्य देत असल्याचे दिसते. या अर्थसंकल्पात आंध्र प्रदेशची राजधानी अमरावतीच्या उभारणीसाठी १५,000 कोटी रुपये आणि बिहारमध्ये बोधगया मंदिर कॉरिडॉर आणि महामार्ग बांधण्यासाठी २0000 कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे जी राष्ट्रीय सामाजिक सहाय्य कार्यक्रम सारख्या कल्याणकारी योजनांसाठी तरतूद केलेल्या बजेटपेक्षा जास्त आहे. पीएम पोशन, स्मार्त्य इ.

नवीन सरकारच्या पहिल्या अर्थसंकल्पात या आव्हानांना अर्थपूर्णपणे तोंड देण्यासाठी वाटपाचा समावेश असेल (कमी) अपेक्षा होत्या. तथापि, सामाजिक सुरक्षेवरील कमी झालेला आणि रखडलेला खर्च हे स्पष्ट करतो की या समस्यांना सरकारसाठी फारसे महत्त्व नाही.

इंडिया एजिंगच्या अहवालात असे आढळून आले आहे की सध्या भारतातील सुमारे सहा कोटी वृद्ध सर्वात गरीब संपत्ती श्रेणीत मोडतात आणि अंदाजे १८.७% वृद्ध कोणत्याही उत्पन्नाशिवाय जगतात. असे असूनही, छ्ठ-झ, वृद्धांना २00 रुपये आणि विधवा आणि दिव्यांग व्यक्तींना ३00 रुपये विना-सहयोगी उत्पन्न समर्थन देणारी केंद्र पुरस्कृत योजना, केवळ १६ कोटी रुपयांनी वाढवण्यात आली आहे. या गंभीर सामाजिक सुरक्षा योजनेसाठी वाटप केलेले बजेट एकूण अर्थसंकल्पीय खर्चाच्या केवळ 0.२% इतके कमी झाले आहे. निवृत्ती वेतनाची रक्कम आणि लाभार्थींच्या याद्या अपरिवर्तित राहिल्याने, कार्यक्रमासाठी २0१६-१७ पासून ९,५00 कोटी रुपयांचे वाटप स्थिर राहिले आहे. चलनवाढीशी जुळवून घेतल्यास, वाटपांमध्ये खऱ्या अर्थाने घट झाली आहे. केंद्रीय अर्थसंकल्प कमी होत असल्याने, पुरेशा पेन्शन रकमेची खात्री करण्याचा वित्तीय भार राज्यांवर वळला आहे. परिणामी, बहुतेक राज्ये आता त्यांच्या स्वत:च्या बजेटमधून ५ ते १0 पट अधिक योगदान देत आहेत.

ज्या वेळी देश बेरोजगारीच्या संकटात सापडला आहे, त्या वेळी महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेसाठी वाटप फक्त ८६,000 कोटी रुपये आहे. आर्थिक वर्ष २0२२-२३ चा प्रत्यक्ष खर्च ९0,८0५ कोटी रुपये असूनही, आर्थिक वर्ष २0२३-२४ साठीचे बजेट केवळ ६0,000 कोटी रुपये ठेवण्यात आले होते. हे नंतर ८६,000 रुपये करण्यात आले हे म्हणजे विहिरीत आणखी काही नाणी जोडून दुष्काळाचा प्रश्न सुटल्याचा दावा करण्यासारखे आहे. पीपल्स क्शन फॉर एम्प्लॉयमेंट गॅरंटी सूचित करते की, बजेटमधील महत्त्वपूर्ण कमतरता हायलाइट करून संपूर्ण मागणी पूर्ण करण्यासाठी २.७२ लाख कोटी रुपये आवश्यक आहेत. झ-एऋ ने गणना केली की २0२२-२३ मध्ये ५.६८ कोटी कुटुंबांसाठी १00 दिवसांच्या कामाची मागणी पूर्ण करण्यासाठी २.७२ लाख कोटी रुपये आवश्यक आहेत.

२0२३-२४ मध्ये सहा कोटी कुटुंबे कार्यरत असताना, चऋछछएॠ बजेट मागणी पूर्ण करण्यासाठी अपुरे आहे. सध्या, कार्यक्रमात १३ कोटींहून अधिक सक्रिय कामगार नोंदणीकृत आहेत. भारताच्या आर्थिक सर्वेक्षणाने हे मान्य केले आहे की, मनरेगा ही पुरवठा-आधारित योजनेप्रमाणे चालविली जात आहे, जिथे रोजगाराची मागणी केल्यावर अनेकदा अनुपलब्ध असते. याशिवाय, रोजगार उपलब्ध करून दिल्यावर कामाची मागणी पोर्टलवर नोंदवली जात नाही. परिणामी, कामाची वास्तविक मागणी मॅनेजमेंट इन्फॉर्मेशन सिस्टम पोर्टलवर दर्शविल्या गेलेल्यापेक्षा जास्त आहे, जी ग्रामीण दुःखाची खरी व्याप्ती प्रतिबिंबित करण्यात अयशस्वी ठरते.

भारताच्या आर्थिक महत्त्वाकांक्षा वाढत असताना, सरकारचे अर्थसंकल्पीय वाटप आणि कल्याणकारी धोरणांची खराब अंमलबजावणी हे उपेक्षा आणि दुर्लक्षाचे चित्र रंगवते. महत्त्वाच्या कार्यक्रमांमधील लक्षणीय घट हे सर्वाधिक जोखीम असलेल्या व्यक्तींकडे सतत होत असलेले दुर्लक्ष सूचित करते, ज्यांना त्यांची सर्वाधिक गरज असते त्यांच्या आकलनापलीकडे आर्थिक वाढीचे फायदे ठेवतात.

## व्यंगचित्रे




-महादेव साने,मलकापूर ता.कराड जि.सातारा

## सुविचार

आयुष्यातील सर्वात मोठी शिक्षा
म्हणजे स्वत:ला समजून घेणे.

## आरोग्य

### जगात का वाढतोय आयवीएफचा व्यवसाय?:पुरुष-महिलांतील वाढत्या वंध्यत्वाची कारणे

दिवस २५ जुलै १९७८. रात्रीचे सुमारे साडेअकरा वाजले असावेत. इंग्लंडच्या मँचेस्टर जिल्हा रुग्णालयाबाहेर गर्दी जमली होती. या गर्दीत रुग्ण आणि त्यांचे कुटुंबीय नसून डॉक्टर आणि पत्रकार होते. लेबर रूममधून बातमी आली की ती मुलगी आहे. सर्वांनी आनंदाने उड्या मारल्या. दुसऱ्याच दिवशी जगभरातील वृत्तपत्रांची हेडलाईन होती- जगातील पहिल्या टेस्ट ट्यूब बेबीचा जन्म.

तेव्हापासून हा दिवस म्हणजेच २५ जुलै हा जागतिक भ्रूणशास्त्रज्ञ दिन म्हणून साजरा केला जातो.

वैद्यक आणि विज्ञानाच्या जगात ही एक मोठी उपलब्धी आहे. स्त्रीरोगतज्ज्ञ पॅट्रिक स्टेप्टो आणि शास्त्रज्ञ रॉबर्ट एडवर्ड्स यांनी हा अद्भुत पराक्रम केला आहे. १० वर्षात २८२ अपयशानंतर त्यांना हे यश मिळाले. लुईस ब्राउन असे या मुलीचे नाव होते.

एक तो दिवस होता आणि आज दरवर्षी ५ लाखांहून अधिक टेस्ट ट्यूब बेबी तयार होतात. वर्ल्ड हेल्थ ऑर्गनायझेशनच्या म्हणण्यानुसार, २०१८ पर्यंत जगात ८० लाखांहून अधिक टेस्ट ट्यूब बेबींची प्रसूती झाली आहे. हा ट्रेंड झपाट्याने वाढत आहे.ज्यांना नैसर्गिक मर्यादांमुळे हे शक्य झाले नाही, अशा असंख्य लोकांना विज्ञानाने पालक बनण्याचा आनंद दिला आहे. इथे लक्षात घेण्यासारखी गोष्ट म्हणजे जगभरातील घटत्या प्रजनन दराला आपल्या सवयी आणि वाईट जीवनशैली कारणीभूत आहे.

आयवीएफ व्यवसायाच्या वाढीची प्रमुख कारणे कोणती? गेल्या काही वर्षांत आयव्हीएफ व्यवसायाच्या झपाट्याने वाढ होण्याचे कारण म्हणजे आपली खराब जीवनशैली, खाण्यापिण्याच्या चुकीच्या सवयी, कमी शारीरिक हालचाली आणि दारू आणि सिगारेटचे व्यसन.याशिवाय जागरूकता हेही एक मोठे कारण आहे. पूर्वी, वंध्यत्वाच्या बाबतीत, लोकांना त्याच्या उपचारांबद्दल माहिती नव्हती. त्यांनी खतञ द्वारे मूल होणे, हे परंपरा आणि धर्माच्या विरुद्ध मानले. काळानुसार लोकांमध्ये जागरूकता वाढली असून ते उपचारासाठी पुढे येत आहेत.

वंध्यत्वाची कारणे काय आहेत?

स्त्री आणि पुरुष दोघांमध्ये वंध्यत्वाची वेगवेगळी कारणे आहेत. स्त्री-पुरुषांपैकी एकात किंवा दोघांमध्ये वंध्यत्वाची समस्या असल्यास नैसर्गिकरित्या मूल होणे शक्य नसते. अशा परिस्थितीत आयव्हीएफ तंत्राचा अवलंब करावा लागतो.पुरुष-शुक्राणुंची खराब गुणवत्ता,शुक्राणुंची संख्या कमी होण्याचे कारण,जास्त खराब वातावरणाच्या संपर्कात आल्यामुळे,जास्त दारू आणि सिगारेट पिण्यामुळे,सर्वाधिक शारीरिक आणि मानसिक तणाव,कॅन्सरची औषधे आणि पावरफूल मेडिसीन घेण्याचे कारण.

महिला-ओव्ह्यूलेशन विकार म्हणजेच वेळेवर ओव्हरीमधून अंडी बाहेर न पडणे,फैलोपियन ट्युबमध्ये ब्लॉकेज होणे,गर्भाशयाची समस्या,लवकरच मॅनोपॉज होणे,पेल्विक एरियाचे पार्ट्स जसे की फेलोपियन ट्यूब, ओव्हरी, युटेरसचे एकमेकांशी जुळणे.कॅन्सर ट्रिटमेंट.

पुरुष आणि महिलांमध्ये वंध्यत्वामागे अनेक कारणे आहेत. प्रथम आपण पुरुषांमधील वंध्यत्वाची कारणे समजून घेऊ आणि त्याच्या प्रतिबंधाविषयी जाणून घेऊ.शुक्राणूंचा कमकुवतपणा आणि बिघाडःयाचा अर्थ शुक्राणूंची मात्रा किंवा गुणवत्तेवर परिणाम झाला आहे. यामागे अनेक वैद्यकिय परिस्थिती असू शकते. जसे की अंडकोष जागेवर नसणे, अनुवांशिक कमतरता, हार्मोनल समस्या, मधुमेह आणि दारू आणि सिगारेट सारखी औषधे.

माणदेश वार्ता हे साप्ताहिक मालक, प्रकाशक, संपादक सोनवणे रोहित मारूती यांनी मुद्रक माळी अशोक बाळकृष्ण यांच्या बाळकृष्ण ऑफसेट प्रिंटर्स,नेहरू चौक, कोर्टा जवळ, सांगोला, जि. सोलापूर येथे छापून १२७९ अ भारत गल्ली, सांगोला, जि.सोलापूर येथे प्रसिद्ध केले. E-Mail- mandesh_varta@rediffmail.com
संपादक : सोनवणे रोहित मारूती (या अंकातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.) . मो. ९४२०६६६५०१, ९०२८५९१४३१

# लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांना मरणोत्तर भारतरत्न पुरस्काराने सन्मानित करावे - आमदार शहाजीबापू पाटील

सांगोला : जगात वेगवेगळ्या पद्धतीने राज्यक्रांती झाली आहे. बंदुकीच्या नळीच्या जोरावर क्रांती घडली आहे, लोकशाही च्यार आंदोलनातून क्रांती घडली आहे. परंतू, लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांनी विचारातून आणि लिखाणातून सामाजिक क्रांती केली. त्यांच्या विचारांचा धागा पिढ्यानपिढ्या तेवत राहिला आहे. परखड लिखाणातून रंजलेल्या, गंजलेल्या, पिचलेल्या, वंचितांची आर्त हाक प्रस्थापितांच्या कानावर आदळावी आणि वंचित समाजाला न्याय मिळावा यासाठी आपलं उभं आयुष्य मानवतेसाठी व शोषणमुक्त समाजासाठी समर्पित करणाऱ्या लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांना मरणोत्तर भारतरत्न सर्वोच्च नागरी पुरस्कारानं सन्मानित करण्यात यावं, असे मत आमदार शहाजीबापू पाटील यांनी व्यक्त केले. साहित्यरत्न, लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या १०४ व्या जयंतीनिम्मित त्यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करताना आमदार शहाजीबापू पाटील बोलत होते.

पुढे बोलताना आमदार शहाजीबापू पाटील म्हणाले की, साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांचे साहित्य हे परिवर्तनाला दिशा व चालना देणारे ठरले आहे. महाराष्ट्राच्या एकूणच जडणघडणीत आणि परिवर्तनात या साहित्याचे योगदान महत्त्वपूर्ण मानले जाते. वंचित घटकांना समाजाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांचे मोठे योगदान आहे. वंचित असलेल्या समाजाचे वास्तव जीवन आपल्या प्रखर लेखणीच्या माध्यमातून चित्रित करून लेखणी अहोरात्र झिजवली. ते आपल्या लेखणीतून सातत्याने दलित, वंचित, पीडित, उपेक्षित, बहिष्कृत आणि अन्यायग्रस्त माणसांची व्यथावेदना मांडत राहिले. स्वातंत्र्य, समता, न्याय,



आत्मसन्मान आणि आर्थिक समतोल निर्माण करण्यासाठी आपल्या जीवाची बाजी लावणारे, बंडखोरी करणारे, धाडसी, करारी, शूरवीर आणि स्वाभिमानी नायक त्यांनी रेखाटले. साहित्यातून समाज प्रबोधन आणि त्यातून समाज परिवर्तन हेच त्यांच्या साहित्याचे सूत्र होते. अण्णाभाऊंचं साहित्य क्षेत्रातील योगदान आणि शोषितांसाठी त्यांनी समर्पित केलेलं आयुष्य याची दखल घेऊन त्यांना भारतरत्न सर्वोच्च नागरी पुरस्कारानं सन्मानित करण्यात यावं, असे मत आमदार शहाजीबापू पाटील यांनी व्यक्त केले.

यावेळी दामोदर साठे, विनोद रणदिवे, बापूसाहेब ठोकळे, किशोर बनसोडे, सागर पाटील, गुंडादादा खटकाळे, अमित साठे, सचिन रणदिवे, भिवा भोसले, बाळासाहेब रणदिवे, महादेव कांबळे यांच्यासह आण्णाभाऊ साठे जयंती उत्सव मंडळाचे पदाधिकारी, कार्यकर्ते, अन्य लक्ष्मीदेवी विद्यामंदिर सोनंदमध्ये आण्णाभाऊ साठे जयंती व लोकमान्य टिळक पुण्यतिथी साजरी मान्यवर, नागरिक उपस्थित होते.

# सांगोला नगरपरिषद व बँक ऑफ महाराष्ट्र यांच्या माध्यमातून स्वयंसहायता महिला बचत गटांना सवलतीच्या व्याजदरातील कर्जाचे वितरण

सांगोला : सांगोला नगरपरिषद अंतर्गत राबविण्यात येणाऱ्या केंद्रशासन पुरस्कृत राष्ट्रीय नागरी उपजीविका अभियान या योजनेंतर्गत महिला सक्षमीकरण व त्यांचे जीवनमान उंचाविण्याच्या दृष्टीने विविध उपक्रम घेतले जातात. या अनुषंगाने सांगोला शहरामध्ये २०० पेक्षा अधिक स्वयंसहाय्यता महिला बचत गट स्थापन करण्यात आलेले आहेत. बचत गटांना अंतर्गत कर्ज व्यवहारासाठी नगरपरिषदेच्या वतीने र.रु. १००००/- इतका फिरता निधी अनुदान म्हणून दिला जातो. त्याच प्रमाणे ज्या बचत गटांना स्थापन होऊन सहा महिन्यापेक्षा जास्त कालावधी झालेला असेल अशा बचत गटांना बँकेच्या सवलतीच्या व्याज दराने नगरपरिषदे अंतर्गत कर्ज उपलब्ध करून दिले जाते. राष्ट्रीय नागरी उपजीविका अभियान या योजनेच्या माध्यमातून शहरातील महावीर व शिवसमर्थ या स्वयंसहायता महिला बचत गटांना महाराष्ट्र बँकेच्या माध्यमातून व्यवसाय वाढीसाठी अनुक्रमे रु.८ लक्ष व ५ लक्ष इतक्या कर्जाचे वितरण मुख्यधिकारी तथा प्रशासक डॉ.सुधीर गवळी यांच्या हस्ते करण्यात आले.

यावेळी बँक ऑफ महाराष्ट्राचे व्यवस्थापक श्री नागेश गुंजोटे व सहा.प्रकल्प अधिकारी श्री योगेश गंगाधरे हे उपस्थित होते. तसेच धनादेश स्वीकारण्यासाठी महावीर व शिवसमर्थ या दोन्ही बचत गटांच्या अध्यक्षा, सचिव व सर्व महिला सदस्य उपस्थित होते.

# सांगोला शहरातील बाळकृष्ण तेली यांचे निधन

सांगोला : सांगोला शहरातील श्री.बाळकृष्ण दगडू तेली यांचे बुधवार दि.३१ जुलै रोजी निधन झाले. निधनासमयी त्यांचे वय ७६ होते.माजी नगरसेवक व प्रसिध्द उद्योगपती माऊली तेली यांचे ते वडील होत. त्यांच्या पार्थिवावर रात्री उशिरा अत्यसंस्कार करण्यात आले.

यावेळी सांगोला शहरातील व्यापारी, राजकीय पक्षाचे नेते, कार्यकर्ते, इंजिनिअर, शिक्षक मोठ्या संख्येने उपस्थित होते. त्यांच्या पश्चात पत्नी, २ मुले, ४ मुली, सुना, जावई, नातंवडे असा मोठा परिवार आहे.



# सांगोला नगरपरिषद बुलेटिन जुलै -२०२४



सांगोला : शहरात महिला व बालकल्याण विकास विभाग आणि सांगोला नगरपरिषद यांच्या संयुक्त विद्यमानाने मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेची प्रभावी अंमलबजावणी सुरू आहे. आज अखेर एकूण २२२७ अर्जापैकी पैकी १८५६ अर्ज ऑनलाइन भरले गेले आहेत. अर्ज भरण्यासोबतच यापूर्वी भरण्यात आलेले ऑनलाइन अर्जाची पडताळणी करण्याचे काम देखील सुरू आहे. शहरात अंगणवाडी केंद्र, नगर परिषद कार्यालय अर्ज भरण्याचे काम सुरू आहे.

देशातील प्रत्येक कुटुंबाला पक्के घर असायला हवे ह्या हेतूने शहरातील गरिबांसाठी प्रधानमंत्री आवास(शहरी) या योजनेची सुरुवात डिसेंबर २०१५ रोजी करण्यात आली होती. केंद्र शासनाच्या या योजनेची सांगोले नगपरिषदेमार्फत प्रभावी अंमलबजावणी सुरू आहे. आजअखेर सांगोला शहरात एकुण २०३ घरकुलांचे बांधकाम पूर्ण झाले असून ४८ घरकूल पूर्णत्वास येत आहेत. या योजनेत पात्र लाभार्थ्याला स्वतःच घर बांधण्यासाठी राज्य शासनाचे १ लाख व केंद्र शासनाचे १.५ लाख असे एकूण २.५ लाख वितरित करण्याची तरतूद आहे. सांगोले नगरपरिषदेचा एकुण ५५ लाभार्थ्यांचा ५ वा सविस्तर प्रकल्प अहवालास ऑक्टोबर २०२३ रोजी शासना कडून मंजुरी मिळालेली आहे. राज्य शासनाचे १ लक्ष प्रमाणे अनुदान नगरपरिषदेस मंजूर झाले आहे. माहे जूलै २०२४ अखेर १० पात्र लाभार्थ्यांना बांधकाम प्रगतीच्या टप्प्यानुसार ६०,००० रुपये प्रमाणे अनुदान बँक खात्यावर जमा करण्यात आले आहे.

सांगोला नगरपरिषद हद्दीमध्ये १५२६४ मालमत्ता धारक असून अद्यापही बऱ्याच मालमत्ताधारक यांनी नोंदी नगरपरिषदेकडे केल्या नसल्याने नगरपरिषदेकडून वार्षिक पुरवणी कर आकारणी ची मोहीम हाती घेण्यात आली आहे. सांगोला नगरपरिषद हद्दीतील ज्या मालमत्तांची अद्याप पर्यंत नगरपरिषदेकडे नोंद करण्यात आलेली नाही त्यांची नोंद करून नगरपरिषदेच्या उत्पन्नात वाढ होणे हा यामागील उद्देश आहे. जेणेकरून नगरपालिकेमार्फत करण्यात येणारी विकासकामे व नागरिकांना चांगल्या सोयी देता येतील. त्यास अनुसरून आजपर्यंत ४४० नवीन मालमत्तांची मोजणी नगरपरिषदेच्या कर विभागाकडून करण्यात आली आहे. ✻ नगरपरिषदेच्या आरोग्य विभागाकडून नालेसफाई करणे, तुंबलेल्या गटारी स्वच्छता करणे, तसेच दैनंदिन स्वच्छतेची कामे करण्यात येत असून साथीच्या रोगांना आळा घालण्यासाठी योग्य त्या उपाययोजना करण्यात येत आहेत. ✻ सांगोला शहरातील भटक्या जनावरांसाठी कोंडवाडा तयार करण्यात आला आहे.

सांगोला नगरपरिषद मार्फत माझी वसुंधरा ५.० अंतर्गत वासुद रोड पाण्याची टाकी येथे नवीन नर्सरी तयार करण्यात आली आहे. तसेच बनकर वस्ती येथे वृक्षारोपण करण्यात आले.

एकल प्लास्टिक वापरास बंदी मोहिम सांगोला शहरात राबविण्यात येत असून प्लास्टिक बंदी व जनजागृती कार्यक्रम घेण्यात येत आहेत.

सांगोला शहराच्या मलनिः सारण (भुयारी गटार योजना) टप्पा क्रमांक १ चे काम प्रगतीपथावर सुरू आहे. सदर योजनेअंतर्गत ३१ जुलै २०२४ पर्यंत शहरात विविध ठिकाणी २०० चच व्यासाची पाईप लाईन १९.६८ किमी, २५० चच व्यासाची पाईप लाईन ११५.५ मीटर टाकण्यात आली आहे. तसेच ५९१ चरपहेश्रश पूर्ण झाले असून ६२३ चरपहेश्रश चे काम सुरु आहे.

सांगोला नगरपरिषद अंतर्गत राबविण्यात येणाऱ्या केंद्रशासन पुरस्कृत राष्ट्रीय नागरी उपजीविका अभियान या योजनेंतर्गत महिला सक्षमीकरण व त्यांचे जीवनमान उंचविण्याच्या दृष्टीने विविध उपक्रम घेतले जातात. या अनुषंगाने सांगोला शहरामध्ये २०० पेक्षा अधिक स्वयंसहाय्यता महिला बचत गट स्थापन करण्यात आलेले आहेत. बचत गटांना अंतर्गत कर्ज व्यवहारासाठी नगरपरिषदेच्या वतीने र.रु. १००००/- इतका फिरता निधी अनुदान म्हणून दिला जातो. त्याच प्रमाणे ज्या बचत गटांना स्थापन होऊन सहा महिन्यापेक्षा जास्त कालावधी झालेला असेल अशा बचत गटांना बँकेच्या सवलतीच्या व्याज दराने नगरपरिषदेअंतर्गत कर्ज उपलब्ध करून दिले जाते.

राष्ट्रीय नागरी उपजीविका अभियान या योजनेच्या माध्यमातून शहरातील महावीर व शिवसमर्थ या स्वयंसहायता महिला बचत गटांना महाराष्ट्र बँकेच्या माध्यमातून व्यवसाय वाढीसाठी अनुक्रमे र.रु. ८ लक्ष व ५ लक्ष इतक्या कर्जाचे वितरण मा.मुख्यधिकारी तथा प्रशासक डॉ.सुधीर गवळी यांच्या हस्ते करण्यात आले.

नगरपरिषदेच्या विद्युत विभागामार्फत शहरातील ४००० स्ट्रीट लाईट्सचे देखभाल दुरुस्तीचे काम नियमित सुरू असून कोणतीही लाईट तक्रार दोन दिवसात नियमितपणे निर्गत केली जात आहे. सांगोले नगरपरिषद हद्दीत नागरी दलितेत्तर सुधारणा योजनेअंतर्गत स्ट्रीट लाईट सोय नसलेल्या शहरातील विविध भागात ३६९ पोल उभा करणेत आलेले असून स्ट्रीट लाईट व्यवस्था करण्यात येत आहे. ✻ नगरपरिषदेच्या बांधकाम विभागामार्फत पठाणबाबा दर्गाचे भूमिपूजन करण्यात आले. सदर दर्गाचे १२१ चौ.मी. बांधकाम असून त्यासाठी प्रस्तावित रक्कम २४.२६ लक्ष रू. एवढी आहे. तसेच कोपटे वस्ती येथे ७३ चौ.मी. क्षेत्राचे व २४.७४ लक्ष एवढ्या प्रस्तावित रक्कमेच्या सभागृहाचे भूमिपूजन करण्यात आले.

# मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेत सांगोल्यात ४२ हजार महिलांची नोंदणी - आमदार शहाजीबापू पाटील

## अंगणवाडी सेविकाच्या माध्यमातून अर्जाचे संकलन, योजना प्रभावीपणे राबविण्याच्या सूचना



सांगोला : राज्य शासनामार्फत मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना राबविण्यात येत आहे. या योजनेचा सांगोला तालुक्यातील जास्तीत जास्त महिलांना लाभ मिळावा, याकरिता प्रशासनाने राबविलेल्या विविध उपाययोजनांमुळे सांगोला तालुक्यात आजपर्यंत ४२ हजारांहून अधिक महिलांची नोंदणी झाली आहे. तालुक्यात या योजनेची प्रभावीपणे अंमलबजावणी करण्यासाठी असल्याची अधिकाधिक कर्मचाऱ्यांची नियुक्ती करावी अशा सूचना शिवसेनेचे आमदार शहाजीबापू पाटील यांनी बैठकीत दिल्या.

सांगोल्यात मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेची प्रभावीपणे अंमलबजावणी करण्यासाठी तसेच या योजनेचा आढावा घेण्यासाठी तहसील कार्यालयात आमदार शहाजीबापू पाटील यांच्या अध्यक्षतेखाली बैठक आयोजित करण्यात आली होती. यावेळी शहाजीबापू पाटील यांनी अर्ज अपलोड करणे, कागदपत्रांची छाननी, तसेच लाभार्थीची यादी प्रसिद्ध करणेबाबत सखोल मार्गदर्शन केले.

सांगोला तालुक्यात आजपर्यंत ऑनलाइन व ऑफलाइन असे ४२ हजारांहून अधिक महिलांची नोंदणी झाली आहे. मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेच्या व्यापक प्रचार, प्रसिद्धीमुळे, तसेच प्रशिक्षण देण्यात आलेल्या अंगणवाडी सेविकांमार्फत सांगोला तालुक्यात महिला लाभार्थ्यांची नोंदणी अद्यापही सुरू आहे. मुख्यमंत्री माझी लाडकी बहिण योजनेतील लाभार्थी महिलांचे अर्ज अंगणवाडी सेविकाच्या माध्यमातून संकलन करण्यात येत आहेत. सांगोला तालुक्यात मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना प्रभावीपणे राबविण्यात येत असून या योजनेचा सांगोला तालुक्यातील अधिकाधिक महिलांना लाभ मिळावा यासाठी प्रशासनाने अधिक कर्मचाऱ्यांची नियुक्ती करावी अशा सूचना आमदार शहाजीबापू पाटील यांनी बैठकीत दिल्या.

या बैठकीला सदस्य सचिव तथा तहसीलदार संतोष कणसे, सदस्य मुख्याधिकारी डॉ.सुधीर गवळी, गटविकास अधिकारी आनंद लोकरे, बालविकास प्रकल्प अधिकारी सोलापूर पश्चिम वर्षा पाटील, निवडणूक नायब तहसिलदार शुभांगी जाधव, बालविकास प्रकल्प अधिकारी अभिजित मोलाने, संरक्षण अधिकारी (कनिष्ठ) एस.एस. चव्हाण, सहाय्यक गटविकास अधिकारी मिलिंद सावंत, अव्वल कारकून मिलिंद पेठकर, अशासकीय सदस्यपदी डॉ.पियूष साळुंखे पाटील व शिवाजी गायकवाड,अंगणवाडी पर्यवेक्षिका श्रीमती राजश्री जंबेनाळ, विस्तार अधिकारी वसंत फुले, ए.यु. तोडकरी, एस. एस.पारसे आदी उपस्थित होते.

# आबासाहेब यांच्या सारखी माणसे मोजकीच होऊन गेली- ह.भ.प.प्रकाश महाराज साठे

### स्व.डॉ.गणपतराव देशमुख यांच्या तृतीय पुण्यस्मरण दिनानिमित्त सांगोल्यात अभिवादन





सांगोला : आबांनी आयुष्य भर समाजसेवा केली असून सामाजिक बांधिलकीही जपली. सगळ्या पक्षांच्या लोकानी आबांवर नितात प्रेम केले. आबासाहेब यांच्या सारखी माणसे मोजकीच होऊन गेली असून ज्यांनी सामान्याच्या सामान्यावर सुध्दा प्रेम केले. प्रत्येकाने आबासाहेब यांचेकडून निष्ठा शिकावी, असे उद्गार ह.भ.प.प्रकाश साठे यांनी व्यक्त केले.

स्वर्गीय भाई आमदार गणपतराव देशमुख यांच्या तृतीय पुण्यस्मरण दिनानिमित्त सांगोला सुतगिरणी येथील समाधीस्थळावर भजन कीर्तन पुष्पवृष्टी कार्यक्रम संपन्न झाला. यावेळी कीर्तन केसरी ह भ. प.प्रकाश महाराज साठे बोलत होते. यावेळी आबासाहेबांच्या पत्नी रतनबाई गणपतराव देशमुख, बहिण रुक्मिणी गावडे, कन्या शोभाताई पाटील, चिरंजीव पोपट देशमुख, चंद्रकांत देशमुख, नातू डॉ.बाबासाहेब देशमुख व डॉ.अनिकेत देशमुख यांच्यासह देशमुख कुटुंबिय उपस्थित होते. यावेळी आमदार शहाजीबापू पाटील, आ.समाधान आवताडे, मा.आ.दिपकआबा साळुंखे पाटील, प्रा.प्रबुध्दचंद्र झपके सर, शिवतेजसिंह मोहिते–पाटील, ब्रह्मानंद पडळकर, नागेश फाटे, व्यंकट आण्णा भालके, प्रणव परिचारक, समाधान काळे, बाळराजे पाटील, प्रा.शिवाजीराव काळुंगे सर, शिवाजीराव पाटील, चेतन नरोटे, पोलीस निरीक्षक भीमराव खणदाळे, डॉ.प्रभाकर माळी, मारुतीआबा बनकर, बाळासाहेब एरंडे, माजी चिटणीस विठ्ठलराव शिंदे, चिटणीस दादाशेठ बाबर, यांच्यासह सर्व राजकीय पक्षांचे पदाधिकारी कार्यकर्त्यांसह सांगोला तालुक्यातील नागरिक, शेतकरी कामगार पक्षाचे कार्यकर्ते, तालुक्यातील सर्व विविध संस्थाचे सर्व पदाधिकारी, सदस्य, यांनी स्वर्गीय गणपतराव देशमुख यांना अभिवादन केले.

# गौडवाडी डाळिंब उत्पादनाचा पॅटर्न हा फक्त तालुक्यापुरता मर्यादित न राहता तो जिल्ह्यासाठी इतर शेतकऱ्यांना ही प्रेरणादायी : जिल्हाधिकारी कुमार अशिर्वाद

सांगोला : सोलापूर जिल्हा अवर्षण प्रवणग्रस्त जिल्हा म्हणून ओळखला जातो. जिल्ह्यातील भूजल पातळीचा व उपलब्ध पाण्याचा विचार करता उसासारख्या पिकाकडे शेतकऱ्यांचा कल राहिल्यास भविष्यात जल संकट वाढू शकते.तेव्हा या सर्व गोष्टीचा विचार करून शेतकरी बांधवांनी कमी पाण्यावर अधिक उत्पादन देणाऱ्या डाळिंब या पर्यायी पिकाकडे वळणे आवश्यक आहे. तसेच गौडवाडी डाळिंब उत्पादनाचा पॅटर्न हा फक्त तालुक्यापुरता मर्यादित न राहता तो जिल्ह्यासाठी इतर शेतकऱ्यांना ही प्रेरणादायी , मार्गदर्शक ठरावा व शेतकऱ्यांनी त्याचा अवलंब करावा, असे आवाहन जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी केले.

सांगोला तालुक्यातील गौडवाडी येथे कृषी विभागाच्या व गौडवाडी येथिल डाळिंब उत्पादक शेतकरी यांचे वतीने डाळिंब उत्पादक शेतकऱ्यांसाठी शाश्वत व निर्यातक्षम डाळींब उत्पादन कार्यशाळा व प्रक्षेत्र भेट संपन्न झाली . या कार्यशाळेच्या अध्यक्षस्थानावरून श्री कुमार आशीर्वाद यांनी उपस्थित शेतकऱ्यांशी संवाद साधला. यावेळी जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी उपस्थित शेतकऱ्यांच्या मागणीनुसार डाळिंब पिकाला आवश्यक क्रॉपकव्हरच्या अनुदानासाठी तसेच बायोगस युनिट अनुदानासाठी शासनाकडे पाठपुरावा करण्याचे आश्वासन दिले. डाळिंब निर्यातीमधील आडचणी तसेच डाळिंब भौगोलिक मानांकनाचा वापर याबाबत पाठपुरावा करू असे सांगितले. जिल्हाधिकारी यांनी आण्णा गड्दे व नाना माळी यांचे निर्यातक्षम डाळिंब प्लाटची पाहणी केली व समाधान व्यक्त करून अडचणी समजुन घेतल्या. सदर कार्यशाळेसाठी प्रमुख पाहुणे म्हणून जिल्हा अधिक्षक श्री.दत्तात्रय गवसाने, राष्ट्रीय डाळिंब संशोधन केंद्राचे संचालक डॉ.राजीव मराठे, डाळिंब महासंघाचे अध्यक्ष प्रभाकरकाका चांदणे, प्रकल्प संचालक सौ.शितल चव्हाण , कृषी उप संचालक श्री.मदन मुकणे, तहसीलदार श्री.संतोष कणसे, उपविभागीय कृषी अधिकारी श्री.बाळासाहेब लांडगे, वरिष्ठ संशोधक डॉ संग्राम धुमाळ, शास्त्रज्ञ डॉ.सोमनाथ पोखरे, डॉ.प्रशांत कुंभार, श्री सुर्यकांत मोरे , श्री प्रवीण माने यांच्यासह कृषि विभागाचा स्टाफ व शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

या कार्यशाळेसाठी उपस्थित डॉ.राजीव मराठे यांनी जिल्हा पातळीवर निरोगी व सशक्त अशा डाळिंब कलमासाठी प्रमाणित रोपवाटिका स्थापन करणार असल्याचे सांगितले तसेच प्राध्यापक कुंभार सर यांनी डाळिंबातील एक खोड लागवड तंत्रज्ञान याविषयी मार्गदर्शन केले व उपस्थित शेतकऱ्यांना या तंत्रज्ञाचा अवलंब करण्याचे त्यांनी आवाहन केले .

राष्ट्रीय डाळिंब संशोधन केंद्राची वरिष्ठ शास्त्रज्ञ डॉ.धुमाळ सर यांनी डाळिंबाच्या निरोगी रोपांची निवड व त्याचे महत्त्व , डॉ. पोखरे सर यांनी डाळिंबावरील तेलकट रोग व्यवस्थापन मर रोग व्यवस्थापन, सुत्रकृमी व्यवस्थापन याविषयी मार्गदर्शन केले. सदर कार्यशाळेसाठी डाळिंब उत्पादक शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते. प्रास्ताविक तालुका कृषी अधिकारी श्री शिवाजी शिंदे यांनी तर सूत्रसंचालन व आभार कृषी पर्यवेक्षक श्रीधर शेजवळ यांनी मानले. कार्यक्रम यशस्वी करणेसाठी गुरूकृपा शेतकरी गटाचे सदस्य नाना माळी, आण्णा गड्दे, कल्लापा गड्दे, शिवाजी हिप्परकर आदींनी परिश्रम घेतले.

# महापुराचे पाणी दुष्काळी भागासाठी देण्याच्या प्रकल्पाला मंत्रिमंडळाची मान्यता आ.शहाजीबापूंच्या मागणीला यश, सुकाणू समितीची स्थापना

सांगोला : महापुराच्या पाण्याचे नियोजन करून ते पाणी दुष्काळी भागासाठी देण्याचा आराखडा शासनाने तात्काळ तयार करावा, अशी मागणी शिवसेनेचे आमदार शहाजीबापू पाटील यांनी केली होती. या मागणीला यश आले असून कोल्हापूर व सांगली जिल्ह्यातील कृष्णा, भीमा खोऱ्यातील पूर आपत्ती नियंत्रणासाठी जागतिक बँकेच्या सहाय्याने महाराष्ट्र प्रतिसादक्षम विकास कार्यक्रम राबविण्यासाठी कार्यपद्धती निश्चित करण्यात आली आहे.त्यासाठी मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखाली सुकाणू समितीची स्थापना करण्यात आली आहे. महापुराचे पाणी दुष्काळी भागासाठी देण्याच्या प्रकल्पाला मंत्रिमंडळाची मान्यता मिळाली असल्याची माहिती शिवसेनेचे आमदार शहाजीबापू पाटील यांनी दिली.

कोल्हापूर व सांगली जिल्ह्यातील महापुराच्या वाहून जाणाऱ्या पाण्यातून दुष्काळग्रस्त सांगोला तालुक्यासह मंगळवेढा, जत, आटपाडी, कवठेमहांकाळ, खानापूर, तासगाव, माण,खटाव तालुक्यातील तलाव भरून देण्यासाठी म्हैसाळ उपसा सिंचन योजनेचे आवर्तन सुरू करावे. महापुराच्या पाण्याचे नियोजन करून ते पाणी दुष्काळी भागासाठी देण्याचा आराखडा शासनाने तात्काळ तयार करावा, अशी मागणी शिवसेनेचे आमदार शहाजीबापू पाटील यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, जलसंपदामंत्री तथा उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्याकडे केली आहे. या मागणीची शासनाने दखल घेतली असून कोल्हापूर व सांगली जिल्ह्यातील कृष्णा, भीमा खोऱ्यातील पूर आपत्ती नियंत्रणासाठी जागतिक बँकेच्या सहाय्याने महाराष्ट्र प्रतिसादक्षम विकास कार्यक्रम राबविण्यासाठी कार्यपद्धती निश्चित करण्यात आली आहे. कोल्हापूर व सांगली जिल्ह्यातील कृष्णा आणि भीमा नदी खोऱ्यातील भविष्यातील आपत्ती निवारण्यासाठी क्षमता बांधणी करणे आणि पूर व अन्य धोके क्षमविण्यासाठी अनुकूल योजना आणि पूर नियंत्रण व्यवस्थापन बळकट करणे, वातावरणीय बदलाचे परिणाम कमी करण्यासाठी संस्थात्मक क्षमता वाढविणे, दुष्काळ आणि पूर व्यवस्थापनासाठी नियोजन आणि विज्ञानावर आधारित माहितीपूर्ण निर्णय घेऊन जागतिक बँकेच्या सहाय्याने महाराष्ट्र प्रतिसादक्षम विकास कार्यक्रम प्रकल्प राबविण्याबाबत मंत्रिमंडळाच्या मान्यतेने निर्णय घेण्यात आला आहे.

याबाबत महसूल व वन विभागाने (मदत व पुनर्वसन) शासन निर्णय प्रसिद्ध केला आला आहे. विकास कार्यक्रम राबविण्यासाठी, मार्गदर्शन व धोरणात्मक दिशा ठरविण्यासाठी मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखाली सुकाणू समिती स्थापन करण्यात आली आहे. या समितीत सह अध्यक्ष म्हणून मुख्य कार्यकारी अधिकारी, मित्रा तर सदस्यपदी अपर मुख्य सचिव (वित्त), अपर मुख्य सचिव (नियोजन), अपर मुख्य सचिव (जलसंपदा), प्रधान सचिव (मदत व पुनर्वसन) तर सदस्य सचिवपदी संचालक, आपत्ती व्यवस्थापन प्रभाग यांची नियुक्ती करण्यात आली आहे.

प्रकल्पाचे संनियंत्रण करणे, विस्तृत प्रकल्प आराखड्याला मान्यता देणे, प्रकल्पांच्या वार्षिक कृती आराखड्यास मान्यता देणे, प्रकल्पाकरिता घटकनिहाय निधी मंजूर करणे, प्रकल्पासंबंधीच्या आवश्यक त्या वस्तू व सेवांच्या खरेदी प्रस्तावांना मान्यता देण्यात येणार आहे. प्रकल्पावर संपूर्ण देखरेख आणि कामकाज व्यवस्थापनासाठी प्रकल्प अंमलबजावणी कक्षातील प्रतिनिधींचा समावेश असणारी प्रकल्प समन्वय समिती.स्थापन करण्यात आली असून मुख्य कार्यकारी अधिकारी, मित्रा हे या समितीचे अध्यक्ष राहणार आहेत. या प्रकल्पामुळे सांगली व कोल्हापूर जिल्ह्यात पूर परिस्थिती निर्माण झाल्यानंतर सदरचे महापुराचे पाणी सांगोला तालुक्यासह मंगळवेढा, जत, आटपाडी, कवठेमहांकाळ, खानापूर, तासगाव, माण खटाव या दुष्काळी तालुक्यांना देणे सुलभ होणार असल्याचे शिवसेनेचे आमदार शहाजीबापू पाटील यांनी सांगितले.